महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण

MAHARASHTRA STATE LEGAL SERVICES AUTHORITY

ACCESS TO JUSTICE FOR ALL






# समाधान समारोह, २०२६

## सर्वोच्च न्यायालयातील विशेष लोक अदालत

"न्यायप्रक्रियेत सहभाग" आणि "न्याय आपल्या दारी" या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने *'Supreme Court Action for Mediated Adjudication and Disputes Harmonization Across Nation* **(SAMADHAN SAMAROH)'** **"समाधान समारोह"** या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा दिनांक २१ एप्रिल, २०२६ पासून प्रारंभ झालेला असून दिनांक २१, २२ आणि २३ ऑगस्ट, २०२६ रोजी विशेष लोक अदालतीमध्ये समारोप होणार आहे.

सदर विशेष लोक अदालतीचा उद्देश हा सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा संमती-आधारित निराकरण प्रक्रियेद्वारे सलोख्याने निपटारा करणे, हा आहे.

### सहभागासाठी निमंत्रण

सर्व वकील, पक्षकार आणि संबंधित हितधारकांना या उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आणि वादांचे प्रभावी निवारण करण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सदर प्रक्रियेत प्रत्यक्ष किंवा आभासी पद्धतीने (ऑनलाइन) पक्षकार उपस्थित राहू शकतात.

### अर्ज कसा करावा

खाली नमूद गुगल फॉर्मद्वारे पक्षकार आणि त्यांचे वकील आपला अर्ज सादर करू शकतील.

अर्ज : गुगल लिंक **https://forms.gle/jqxefqF4BCWzukoP6**

सहभागी होण्यासाठी सदर अर्ज या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

**https://www.sci.gov.in/**

अर्ज (गुगल फॉर्म) भरण्याची अंतिम तारीख

**३१ मे, २०२६**

**माहिती व सहाय्यासाठी**

कृपया आपल्या जवळच्या विधी सेवा प्राधिकरण अथवा तालुका विधी सेवा समिती यांचेशी संपर्क साधावा.

**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**